# जिल्हा परिषद अमरावती

आदेश

क्रमांक : जिप/मुकाअ/स्विस/ १३९/१६
मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय
दिनांक : १ ऑक्टोबर २०१६

विभाग प्रमुख म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे जिल्हा परिषद अतंर्गत सर्व कार्यालये तसचे कार्यकारी यंत्रणा यांच्या प्रशासकीय आणि आर्थीक बाबींची प्रकरणे मान्यतेसाठी सादर केली जातात. प्राप्त प्रकरणांची विविध शासन निर्णय, स्थायी आदेश, वित्त नियमावली, अधिनियम/कायदे इ. बाबीं विचारता घेवून तपासणीसूची प्रमाणे (checklist) प्राथमिक छाननी होणे आवश्यक आहे. लेखाविषयक तथा प्रशासकीय बाबीच्या प्राथमिक छाननीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयात छाननी चमू (scrutiny team) तयार करुन त्यांचे मार्फत प्राप्त नस्तीचीं नियमावली तथा तपासणीसूची नुसार छाननी होवून सदरच्या नस्ती मान्यतेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे मंजुरीसाठी सादर केल्या जाव्यात असे विचाराधीन होते.

त्यानुसार आता खालील अधिकारी-कर्मचारी यांची छाननी चमू (scrutiny team) तयार करण्यात येत असून त्यांना परिशिष्ट अ प्रमाणे काम सोपविण्यात येत आहे. सदर अधिकारी- कर्मचाऱ्यांनी दररोज एक तास मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय कार्यालयात नस्ती पडताळणीचे कामकाज करावे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी यांचे नांव | पदनाम | विभाग |
|---|---|---|---|
| १ | श्री. विजय भुसाटे, | लेखाधिकारी वर्ग २ शा.पो.आ | शिक्षण विभाग, जि.प. अमरावती |
| २ | श्री. योंगेद्र देशमुख, | सहायक प्रशासन अधिकारी, | ग्रामीण पाणी पुरवठा,<br>जिल्हा परिषद अमरावती |
| ३ | श्री. गजानन कोरडे, | कनिष्ठ प्रशासन अधिकारी, | आरोग्य विभाग,<br>जिल्हा परिषद अमरावती |
| ४ | श्री. तुषार पावडे | कनिष्ठ प्रशासन अधिकारी, | शिक्षण विभाग,जि.प.अमरावती |

(डॉ. किरण कुलकर्णी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती

**टीप - पडताळणी समितीने काढलेल्या त्रृटयाबांबत कार्यालय प्रमुखांच्या काही अडचणी किंवा शंका असल्यास त्यांनी थेट मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करावी.**

प्रतिलिपी

१. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांना माहितीकरिता अग्रेषित.
२. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अमरावती.
३. -------------------------------------------सर्व कार्यालय प्रमुख, जिल्हा परिषद अमरावती यांना माहिती तथा प्र
४. स्वीय सहायक, मु.का.अ. कार्यालय यांना पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.